पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९१। किंमत - ४ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार ०८/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# नाशिक -पुणे सरळ रेल्वे झालीच पाहिजे- जनमताचा रेटा

## तज्ज्ञ समितीसाठी आ. तांबेंचा पाठपुरावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पुणे - नाशिक सरळ रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भात राज्य शासनाने तज्ज्ञ समितीची स्थापना केली असून या निर्णयाचे आमदार सत्यजीत तांबे यांनी स्वागत केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आमदार सत्यजित तांबे यांनी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आहे.

२५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुणे - नाशिक सरळ रेल्वेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनानुसार आता समितीची स्थापना करण्यात आली असून, पुढील ६० दिवसांत समिती आपला अहवाल राज्य शासनाला सादर करणार आहे. या निर्णयाबाबत समाधान व्यक्त करताना आमदार तांबे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाकडे सुरुवातीपासून सकारात्मक दृष्टीने पाहिले आहे. तज्ज्ञ समितीच्या माध्यमातून या प्रकल्पाबाबत वस्तुनिष्ठ अभ्यास होऊन सकारात्मक दिशा मिळेल, अशी अपेक्षा आहे. पुणे - नाशिक सरळ रेल्वेची मागणी ही केवळ एका रेल्वे मार्गापुरती मर्यादित नसून उत्तर महाराष्ट्राच्या विकासाशी निगडित आहे. सिन्नर, अकोले, संगमनेर, नारायणगाव, आंबेगाव, राजगुरुनगर, चाकण मार्गे पुण्याला जोडणारा सरळ रेल्वे मार्ग उद्योग, शिक्षण, रोजगार, शेती आणि व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. रविवार दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी क्रांती दिनानिमित्त सकाळी ९ वाजता पुणे - नाशिक महामार्गावर होणारे चक्काजाम जनआंदोलन नियोजितप्रमाणेच होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




## जिंकण्यासाठीच आंदोलन झाले सुरू...

**यापूर्वी नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेसाठी मंजूरी मिळून भुसंपादन झालेले आहे. व ३५० कोटी पर्यंतची रक्कम वाटून झाली आहे. अशा स्थितीमध्ये नाशिक – पुणे रेल्वे हाच योग्य पर्याय आहे. पुणे– नाशिक सरळ रेल्वे मार्ग हा तीन जिल्ह्यांच्या नागरिकांसाठी अत्यंत गरजेचा प्रश्न असल्याने नगर, नाशिक, पुणे जिल्ह्यातील आणि पुणे– नाशिक मार्गावरील नागरिकांनी जनआंदोलनाद्वारे हा प्रश्न सोडवण्यासाठी कंबर कसली आहे. त्यासाठी दैनिक युवावार्ता स्वतःची जबाबदारी म्हणून प्रचार प्रसाराचे काम सातत्याने करीत आहे. आम्ही या परिसरातील सर्व विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक, विविध संस्था यांना आवाहन करतो की आपला रेल्वे प्रश्न सुटण्यासाठी रविवारी व त्या पुढील काळातही सर्वांनी या आंदोलनात सहभागी व्हावे.**

## आ. खताळांचे केंद्रीय रल्वेमंत्र्यांना साकडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आमदार अमोल खताळ यांनी पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन प्रकल्पासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या समवेत झालेल्या या बैठकीत प्रकल्पामुळे नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्याच्या विकासाला मिळणाऱ्या चालनेबाबत तसेच नागरिकांच्या अपेक्षांबाबत चर्चा झाली.

यावेळी पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्गाच्या प्रस्तावित संरेखनामुळे खोडद येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (ऋच्ठढ) संदर्भात निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी आणि त्यामुळे प्रकल्पाच्या कामाला होत असलेला विलंब याकडे रेल्वेमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.

यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. ही समिती रेल्वे मार्गाच्या संरेखनाचा आणि ऋच्ठढ वर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाहीबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी भूमिका केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांनी व्यक्त केली. यामुळे पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला गती मिळण्याची आशा निर्माण झाली असून, हा बहुप्रतीक्षित प्रकल्प आता मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे मानले जात आहे.

# मराठा-कुणबी प्रमाणपत्रांवरून राजकारण तापले

## जरांगेंचा सरकारवर गंभीर आरोप



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात मराठा समाजातील लोकप्रतिनिधींची कुणबी जात प्रमाणपत्रे आणि जात वैधता प्रमाणपत्रे रद्द झाल्याच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मराठवाड्यात तब्बल चार नगरसेवकांची ओबीसी प्रवर्गातील प्रमाणपत्रे रद्द झाल्याची बाब समोर आल्यानंतर काही निवडून आलेले लोकप्रतिनिधी अडचणीत आले आहेत. याच पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करत खळबळ उडवून दिली आहे.

अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला मिळालेली कुणबी प्रमाणपत्रे आणि त्यांची जात वैधता रद्द करण्यामागे षडयंत्र असल्याचा आरोप केला. १५ लाख रुपयांसाठी प्रमाणपत्रे रद्द केली जात आहेत, असा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दबावामुळे आणि सांगण्यावरून मराठा समाजाची कुणबी प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे दिली जात नसल्याचा दावा करत त्यांनी बावनकुळे यांची नार्को चाचणी करण्याची मागणी केली.

जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर मराठा समाजाचे नुकसान करण्याचा कट रचल्याचा आरोप केला. यावेळी त्यांनी विविध कागदपत्रे आणि पुरावे असल्याचा दावा करत आगामी निवडणुकांमध्ये महायुती सरकारला याची राजकीय किंमत मोजावी लागेल, असा इशाराही दिला. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे यांच्यावर नेहमी सकारात्मक भूमिका घेणाऱ्या जरांगे यांनी यावेळी प्रथमच त्यांच्यावरही थेट टीका केली.

दरम्यान, जरांगे यांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. जात पडताळणी समित्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या चौकटीत काम करतात. त्यांना अर्धन्यायिक अधिकार असून त्यांच्या कामकाजात राज्य सरकार किंवा कोणत्याही मंत्र्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. कुणबी प्रमाणपत्रे किती रद्द झाली, याची मला कल्पना नाही. मात्र मोठ्या प्रमाणात येणाऱ्या प्रमाणपत्रांच्या प्रकरणांमध्ये साधारण १० ते १२ टक्के नकाराचे प्रमाण असते. नॉन-कुणबी प्रमाणपत्रे आढळल्यास किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास प्रमाणपत्रे रद्द होऊ शकतात. जाणीवपूर्वक कुणीतरी प्रमाणपत्रे रद्द करत आहे, असे म्हणणे योग्य नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

(पान २ वर)

# सर्वोच्चकडून बोफोर्स फाईल बंद

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सुमारे ४० वर्षांपूर्वीच्या बोफोर्स घोटाळ्यावरील सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी शेवटची याचिकाही फेटाळून लावली. यामुळे आता हे प्रकरण पूर्णपणे संपुष्टात आले आहे.

न्यायमूर्ती जे.बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने सांगितले की, आता या प्रकरणात पुढील सुनावणीची गरज नाही. २००५ च्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाला आव्हान देणारी अपीलही न्यायालयाने ऐकण्यास नकार दिला, ज्यामध्ये हिंदुजा बंधू आणि बोफोर्स कंपनीला निर्दोष मुक्त करण्यात आले होते. हे प्रकरण १९८६ च्या त्या कराराशी संबंधित आहे, ज्यामध्ये भारताने स्वीडनच्या बोफोर्स कंपनीकडून १,४३७ कोटी रुपयांच्या तोफा खरेदी केल्या होत्या. नंतर आरोप झाले की, या व्यवहारात कमिशन दिले गेले होते. घोटाळ्याच्या आरोपामुळे राजीव गांधी १९८९ ची निवडणूक हरले होते.हे प्रकरण १९८६ मध्ये भारत सरकार आणि स्वीडनची कंपनी एबी बोफोर्स यांच्यात झालेल्या १,४३७ कोटी रुपयांच्या तोफ खरेदी कराराशी संबंधित आहे.

१९८७ मध्ये असा खुलासा झाला की हा करार मिळवण्यासाठी कथितरित्या कमिशन (लाच) देण्यात आली होती. यानंतर हे प्रकरण देशातील सर्वात मोठ्या राजकीय घोटाळ्यांपैकी एक बनले.बोफोर्स प्रकरण बराच काळ चर्चेत राहिले, पण तो न्यायालयात टिकू शकले नाही. याची सर्वात मोठी कारणे तपास आणि पुराव्यांशी संबंधित त्रुटी होती.

ठोस पुरावे सादर होऊ शकले नाहीत: दिल्ली उच्च न्यायालयाने २००५ च्या निर्णयात म्हटले की, उइख आरोपांना सिद्ध करण्यासाठी पुरेसे आणि विश्वासार्ह पुरावे देऊ शकली नाही. आरोप तर लावण्यात आले, पण त्यांना थेट कोणत्याही आरोपीशी जोडणारा दुवा सापडला नाही. तपासात सीबीआय ला स्वीडनमधून जी कागदपत्रे मिळाली, ती खरी नव्हती आणि योग्यरित्या सत्यापितही नव्हती. न्यायालयाने म्हटले की, अशा कागदपत्रांच्या आधारे कोणालाही आरोपी बनवणे योग्य नाही आणि यामुळे न्याय प्रक्रियेचा गैरवापर होतो.

ADVANCE GOLD -SIP- SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# रेल्वे संशोधन समितीविषयी नाराजी

## नाशिक-पुणे रेल्वेमार्गासाठी कृती समिती आक्रमक



युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - नाशिक-पुणे रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या जनआंदोलनाला आता अधिक तीव्र करण्याचा इशारा नाशिक-पुणे रेल्वे कृती समितीने दिला आहे. रेल्वेमार्गाच्या मागणीसंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी डॉ. अनिल काकोडकर यांची नियुक्ती करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर, 'डॉ. काकोडकर यांना समितीतून हटवा; अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,' अशी भूमिका कृती समितीने घेतली आहे.

कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, २४ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका इंग्रीजी वृत्तानुसार, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी जुन्नर तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने खोडद येथील जीएमआरटी प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा विचार करून हा प्रकल्प अन्यत्र हलविण्याची विनंती केली होती. त्यावेळी डॉ. अनिल काकोडकर यांनी खोडद येथील जीएमआरटी प्रकल्पाची जोरदार पाठराखण केल्याचा दावा कृती समितीने केला आहे.

जीएमआरटी ही राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाची वैज्ञानिक सुविधा असून तिच्या संरक्षणाला प्राधान्य असावे, तसेच विकासाचे प्रकल्प अन्य मार्गाने पूर्ण करता येऊ शकतात, अशी भूमिका डॉ. काकोडकर यांनी त्यावेळी मांडल्याचे कृती समितीचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा डॉ. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालीच अभ्यास समिती स्थापन करून सरकारला नेमका कोणता वेगळा निष्कर्ष किंवा अभिप्राय अपेक्षित आहे, असा सवाल कृती समितीने उपस्थित केला आहे. 'आंदोलनाच्या तोंडावर समिती स्थापन करून केवळ आश्वासनाचे गाजर दाखवून पुन्हा जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचा हा प्रकार तर नाही ना?' असा प्रश्नही समितीने उपस्थित केला आहे. नाशिक-पुणे रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांनंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभे राहिले आहे. त्यामुळे हे आंदोलन कोणत्याही परिस्थितीत कमकुवत होता कामा नये, अशी भूमिका कृती समितीने घेतली आहे. ऋचठढच्या कारणास्तव भविष्यातील विकासप्रकल्पांना अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी जनतेने सजग राहण्याची गरज असल्याचे समितीने म्हटले आहे. 'चक्काजाम आंदोलन ही केवळ सुरुवात आहे. रेल्वेमार्गाचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत जनतेने गाफील राहू नये. अंतिम विजयासाठी सातत्याने संघर्ष करावा लागणार आहे,' असे आवाहन कृती समितीने केले आहे.

लोकप्रतिनिधींच्या भूमिकेबाबतही कृती समितीने भाष्य केले आहे. आमदार सत्यजित तांबे हे अपक्ष आमदार असल्याने त्यांची एकट्याची ताकद या प्रश्नासाठी कितपत पुरेशी ठरेल, हा प्रश्न आहे. त्यामुळे नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे आंदोलन हे केवळ लोकप्रतिनिधींचे न राहता जनतेचे आंदोलन म्हणून पुढे नेण्याची गरज असल्याचे समितीने स्पष्ट केले. 'कधी नव्हे ते विकासाच्या प्रश्नासाठी जनता एकत्र आली आहे. ही एकजूट कोणत्याही परिस्थितीत तुटता कामा नये. रेल्वेमार्गाचा प्रश्न अंतिमतः मार्गी लागेपर्यंत आंदोलनाची धार कायम ठेवली जाईल,' असा निर्धार कृती समितीने व्यक्त केला आहे.

९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनाची धार कमी करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून होत असल्याचा आरोप करत कृती समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. 'चक्काजाम होणारच आणि रद्द केलेली रेल्वे पुन्हा आणणारच,' असा निर्धार व्यक्त करत मोठ्या संख्येने नागरिकांनी ९ ऑगस्टच्या जनआंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन नाशिक-पुणे रेल्वे कृती समिती, संगमनेरच्या वतीने करण्यात आले आहे. हे आवाहन समन्वयक सतीश खताळ, रवींद्र हासे, प्रवीण हासे, रामेश्वर पानसरे, प्रितम साबळे, अजय हासे, शिवाजी जगताप, विजय उदावंत, अमोल शेलकर, शिवाजी गुंजाळ, निलेश गुंजाळ, प्रकाश कडलग, समीर लामखडे, राहुल गायकर, मोहसीन शेख, अनिल गुंजाळ, संदीप काकड, डॉ. सचिन वाळे, ॲड. अनिल गोडसे, राम अरगडे, अरुण चव्हाण, ओंकार बिडवे, सत्यजित थोरात, प्रदीप हासे, प्रवीण काकड यांनी केले आहे.

# 'क्या बोलती पब्लिक ?'

## सीजेपीचे देशभर अभियान, राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर



छ. संभाजीनगर (वृत्तसंस्था)

दिल्लीतील जंतर मंतर येथील यशस्वी आंदोलनानंतर देशभरातील नागरिकांच्या कॉक्रोच जनता पार्टीकडून (सीजेपी) आपेक्षा वाढलेल्या आहेत. या आपेक्षांची पूर्तता करण्यासाठी 'क्या बोलती पब्लिक ?' हे अभियान सीजेपीतर्फे देशभर राबविण्यात येणार असल्याची घोषणा संस्थापक अभिजीत दीपके यांनी पत्रकार परिषदेत केली. त्याशिवाय 'सीजेपी'ची राष्ट्रीय कार्यकारिणीही जाहीर केली.

देशभरातील दिल्लीतील आंदोलनानंतर 'सीजेपी'ची पुढील रणनीती ठरविण्यासाठी संस्थापक अभिजित दिपके यांच्या वाळूज येथील निवासस्थानी सहकाऱ्यांसाठी दोन दिवसीय 'राष्ट्रीय कॉक्रोच कनक्लेव्ह'चे आयोजन ५ व ६० ऑगस्ट रोजी केले होते. या बैठकीनंतर आगामी धोरणांची माहिती पत्रकार परिषदेत गुरुवारी दुपारी देण्यात आली. सीजेपीची विचारसरणी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांवर आधारित असणार आहे. त्यांनी भारतासाठी जे स्वप्न पाहिले, ते पूर्ण करण्यासाठी आम्ही संविधानाला धरून लढा देत असल्याचे दिपकेंनी सांगितले.

**'सीजेपी'ची राष्ट्रीय कार्यकारिणी-** कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक आणि राष्ट्रीय संयोजक म्हणून अभिजित दिपके काम पाहणार आहेत. त्याशिवाय सहसंयोजक आशुतोष रांका, सौरव दास, राष्ट्रीय संघटना प्रभारी अजिंक्य शिंदे, संघटना सह-प्रभारी दीपक बालियान, राष्ट्रीय सचिव आफरीन नवाज, मीडिया प्रमुख विजय रेड्डी मल्लांगी, कायदेशीर बाबींचे प्रमुख रत्ना सिंह, संशोधन आणि धोरण प्रमुख वैष्णवी गौर, तंत्रज्ञान प्रमुख रोहन देशपांडे, कोषाध्यक्ष योगेश इंगळे यांची निवड केली आहे.

# तळेगाव दिघे येथे गुटखा तस्करी रोखली

## पावणेतीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील तळेगाव दिघे येथे लोणी रस्त्यावर बुधवारी (दि.५) रात्री आठ वाजेच्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने अवैधरित्या गुटखा व सुगंधी तंबाखूची वाहतूक करणारे वाहन पकडले. या कारवाईत २२ हजार ९१२ रुपयांचा गुटखा, तंबाखू आणि २ लाख ५० हजाराची कार असा एकूण २ लाख ७२ हजार ९१२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलिसांत तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन पोहेकॉ. दत्तात्रेय मेंगाळ, बापूसाहेब अनिल हांडे, कडलग, पोकॉ. राहुल सारबंदे यांच्या पथकाने लोणी रस्त्यावर संशयित कार (एमएच.०४, ईएफ. २५००) पकडली. तिची तपासणी केली असता २२ हजार ९१२ रुपयांचा गुटखा व सुगंधी तंबाखू मिळून आली. पोलिसांनी गुटखा, तंबाखू आणि २ लाख ५० हजाराची कार असा एकूण २ लाख ७२ हजार ९१२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोकॉ. राहुल सारबंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तालुका पोलिसांत राहुल उर्फ गणेश जालिंदर लामखडे, अर्शद बशीर शेख व रमजान उर्फ पप्पू इब्राहिम पठाण (तिघेही रा. तळेगाव दिघे, ता. संगमनेर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. नि. प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक सचिन भाबड हे करत आहे.

## निधन वार्ता

### प्रगतशील शेतकरी गोरक्षनाथ नवले यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

मालदाड - संगमनेर तालुक्यातील मालदाड गावचे प्रगतशील शेतकरी, संगम उद्योग समूहाचे संस्थापक, संगमनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक, कानिफनाथ शेतकरी विकास मंडळाचे नेते तथा बहुआयामी व्यक्तिमत्त्व गोरक्षनाथ शिवराम नवले यांचे बुधवार दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने मालदाड परिसरात शोककळा पसरली आहे.

गोरक्षनाथ नवले यांनी शेती क्षेत्रासह सामाजिक, व्यावसायिक व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांनी शेतीमध्ये विविध प्रयोग करत परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. संगम उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी उद्योग क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. तसेच कानिफनाथ शेतकरी विकास मंडळाच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामस्थांच्या विविध प्रश्नांसाठी ते सक्रियपणे कार्यरत होते.

त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी मालदाड येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मालदाड ग्रामस्थ, आप्तेष्ट, नातेवाईक तसेच विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

त्यांच्या पश्चात आई कृष्णाबाई शिवराम नवले, पत्नी मंदा गोरक्षनाथ नवले, भाऊ बाबासाहेब शिवराम नवले, मुले कैलास गोरक्षनाथ नवले, योगेश गोरक्षनाथ नवले, बाळासाहेब गोरक्षनाथ नवले, पुतणे राहुल बाबासाहेब नवले, रविंद्र बाबासाहेब नवले, पुतणी सुप्रिया आदित्य वाळके तसेच समस्त नवले परिवार असा परिवार आहे. गोरक्षनाथ नवले यांच्या निधनाने संगम उद्योग समूह, कानिफनाथ शेतकरी विकास मंडळ, मित्रमेळा परिवार तसेच मालदाड आणि संगमनेर परिसरातील नागरिकांनी एक कर्तृत्ववान, सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना व्यक्त केली.

पान १ वरून

### मराठा-कुणबी प्रमाणपत्रांवरून...

जात पडताळणी समितीने भाजपच्या अनेक नगरसेवक तसेच जिल्हा परिषद सदस्यांचीही प्रमाणपत्रे रद्द केली असल्याचे सांगत या प्रक्रियेत कोणताही राजकीय हस्तक्षेप नसल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. ही प्रक्रिया न्यायालयीन पद्धतीनेच सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही जात पडताळणी समितीच्या अधिकारांबाबत स्पष्ट भूमिका मांडली. समितीचा निर्णय अंतिम नसतो. एखाद्या व्यक्तीला आपल्यावर अन्याय झाला असे वाटत असल्यास त्याला उच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर नार्को चाचणीसाठी तयार असल्याचेही बावनकुळे यांनी म्हटले आहे. दरम्यान, कुणबी प्रमाणपत्रे, जात वैधता आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. एकीकडे प्रमाणपत्रे रद्द करण्यामागे राजकीय दबाव असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील करत आहेत, तर दुसरीकडे जात पडताळणी समित्या स्वतंत्रपणे आणि न्यायालयीन प्रक्रियेनुसार काम करत असल्याचे सरकारकडून सांगितले जात आहे. त्यामुळे या प्रकरणावरून आगामी काळात मराठा आरक्षणाचा मुद्दा आणखी पेटण्याची शक्यता असून, पुढील घडामोडींकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# साडेनऊ कोटींची फसवणूक करुन विदेशात पळणारे दाम्पत्य पकडले





एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - नफ्याचे आमिष दाखवून व्यावसायिकांची तब्बल शाहेनऊ कोटींची फसवणूक करून विदेशात पळून आण्याच्या तयारीत असलेल्या मुख्य सूत्रधार पती-पानीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी (दि. ५) पुणे विमानतळावरून अटक केली आहे. आरोपींचे २४ बँक खाते गोठविण्यात आले असून, इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

राहुल सुदर्शन जगताप व पायल राहुल जगताप (रा. सन फ्लावर अपार्टमेंट, पुणे) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोघे पती-पत्नी आहेत. आरोपीने अहिल्यानगर शहरातील योगी महेंद्र सबलोक (रा. सर्जेपुरा) यांच्यासह तिघा व्यावसायिकांची ९ कोटी ६९ लाख रुपयांची फसवणूक केली. यासंदर्भात तोफखाना, भिंगार कैम्प आणि एमआयडीसी पोलिस ठाण्यात फसवणुकीचे चार गुन्हे दाखल आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर पुण्यातील आरोपी राहुल व प्रार्थल जगताप हे दोघे फरार होते. पोलिस त्यांच्या शोधात होते ते विदेशात जाण्यासाठी पुणे विमानतळावर येणार आहेत, अशी माहिती अहिल्यानगर पोलिसांना मिळाली. पथकाने पुणे गाठले. विमानतळ पोलिसांच्या मदतीने पथकाने आरोपीला शोधून काढले, विदेशात पळून जाण्याआधीच पती-पत्नीला ताब्यात घेऊन अहिल्यानगरला आणण्यात आले आहे.

तपास ही कारवाई पोलिस निरीक्षक मुटकुळे यांच्या संतोष मार्गदर्शनाखालील पथकाने केली अधिक असून, आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख करत आहेत.

आरोपींची २४ बँक खाते तत्काळ गोठविण्यात खात्यात ३ कोटी ५० लाख रुपये असून, ते आहेत. आरोपींनी अहिल्यानगरसह पुणे जिल फसवणूक केली असण्याची शक्यता आहे. त्यामु तपास करत आहेत. आरोपींनी आणखी कुणा केली असल्यास आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. देविदास देशमुख यांचे निधन



कोले (प्रतिनिधी)

अकोले तालुक्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. देविदास ( दादा) देशमुख यांचे शुक्रवारी पहाटे नाशिक येथे निधन झाले. ते 'नवरदेव' चित्रपटाचे निर्माता दिग्दर्शक, निरंजन देशमुख, शिर्डी येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेले वैभव देशमुख यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने अकोले तालुक्यासह कोतुळ परिसरात शोककळा पसरली आहे.

वकिली व्यवसाय करत असताना ॲड. देशमुख हे अकोले शहरात वास्तव्यास होते. मूळचे कोतुळ येथील रहिवासी असल्याने त्यांनी शेती व्यवसायही सांभाळत कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. आपल्या मुलांच्या शिक्षण व जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. पंचक्रोशीत ते प्रेमाने दादा या नावाने परिचित होते. विधिज्ञ म्हणून काम करताना सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले होते.

त्यांच्या निधनाने कोतुळ परिसराने एक अनुभवी विधीज्ञ, समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व आणि मार्गदर्शक गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात गोपीनाथ, सुभाष, दत्तात्रय, निर्माता दिग्दर्शक निरंजन देशमुख, वैभव देशमुख यांच्यासह मोठा परिवार आहे. ॲड. देविदास देशमुख यांच्या पार्थिवावर दुपारी त्यांच्या मूळ गावी कोतुळ (ता. अकोले) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध क्षेत्रांतून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

### बद्रीनारायणजी भंडारी यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : माहेश्वरी दिंडीचे संस्थापक अध्यक्ष (आद्य प्रवर्तक) तसेच केदारनाथ (बाळू) भंडारी यांचे पिताजी आणि रामनाथ तथा राजेंद्र भंडारी यांचे काकाजी बद्रीनारायणजी मुरलीधरजी भंडारी (वय ८८) यांचे गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री संगमनेर येथे निधन झाले.

त्यांच्या निधनाने भंडारी परिवारासह माहेश्वरी समाजात शोककळा पसरली. शुक्रवारी, दि. ७ ऑगस्ट रोजी त्यांच्या निवासस्थानापासून, भंडारी मिल, सह्याद्री हायस्कूल शेजारी, कॉलेज रोड, संगमनेर येथून अंत्ययात्रा काढण्यात आली. शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अंत्यसंस्कारावेळी विविध क्षेत्रांतील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच माहेश्वरी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बद्रीनारायणजी भंडारी यांच्या निधनाबद्दल दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# विवाह सोहळ्यांसाठी संगमनेरात लागू होतेय आचारसंहिता..

## लॉन्स, केटरर्स, बँड, छायाचित्रकार, भटजी यांच्या संयुक्त बैठकीत निर्णय



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- विवाह सोहळ्यातील परंपरा मोडीत काढीत सध्या विवाह सोहळ्याला अतिशय हिडीस स्वरूप आले आहे. रात्री उशिरापर्यंत कर्कश्श आवाजात डीजे लाऊन चालणारे हळदीचे कार्यक्रम. लग्नाचा मुहूर्त टाळून गेला तरी नवरदेवाची न आवरणारी मिरवणूक यामुळे आलेल्या पाहुण्यांपासून ते लग्न समारंभाशी निगडीत प्रत्येकाला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या सगळ्यात कायद्याचेही उल्लंघन होत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून संगमनेर ता लॉन्स व मंगलकार्यालय असोशिएशनचे अध्यक्ष गोरख वसंतराव कुटे यांच्या पुढाकारातून संगमनेर शहर पोलीस स्टेशनच्या मार्गदर्शनाखाली विवाह सोहळ्याची आचारसंहिता तयार करण्यासाठी वसंत लॉन्स येथे नुकतेच एकत्रित बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीबाबत माहिती देताना गोरख कुटे यांनी सांगितले की, आपली संस्कृती, परंपरा टिकवून ठेवत आणि कायद्याच्या चौकटीत राहून लोकांनी विवाह सोहळ्याचा आनंद घेतला पाहिजे याच हेतूने आम्ही या बैठकीचे आयोजन केले. बैठकीला संगमनेर शहर आणि परिसरातील मंगल कार्यालय, लॉन्स चालक, केटरर्स, पुरोहित, फोटोग्राफर, निवेदक यांच्यासह संगमनेर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संतोष पगारे हे उपस्थित होते. बैठकीत ठरल्यानुसार यापुढे सर्व कार्यक्रम वेळेत आणि मुहूर्तावर पार पडतील, रात्री दहानंतर डीजे किंवा बँड वाजवले जाणार नाही. रात्री अकरानंतर फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफी पूर्णतः बंद असेल, रात्री साडे अकरा वाजता सर्व लॉन्स आणि मंगल कार्यालये बंद होतील. याचबरोबर विवाह सोहळ्याशी निगडीत लॉन्स चालक, भटजी, केटरर, छायाचित्रकार यांच्यासाठीही अंतर्गत नियमावली तयार करण्यात आली आहे.

या बैठकीत संघटनेचे पदाधिकारी अभिजित ढोले, सागर नागरे, रोहिदास धुमाळ, वरूण गुंजाळ, प्रीतम जाधव, ओंकार कुटे, राजू कुटे, भाऊ जाखडी, कैलास जोशी, संकेत मुळे, संदीप शेळके, किरण डोंगरे, सुनील रहाणे, साई दिघे, नीलेश मिसाळ, समीर सराफ, निखिल उपासनी, अनिकेत फटांगरे, ऋत्विक रहाणे, उत्कर्ष जोशी, शाम महाराज, चेतन मुळे, किशोर रहाणे फोटोग्राफीचे अध्यक्ष श्री. गाडेकर यांनी विविध मुद्दे मांडून चर्चेत सहभाग घेतला. संगमनेर शहर व तालुक्यातील मोठ्या प्रमाणात लॉन्सचे चालक -मालक, मॅनेजर, फोटोग्राफर, आचारी, भटजी या सह विविध एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलेश पर्बत यांनी केले तर डॉ. संतोष खेडलेकर यांनी बैठीकीतील सर्व मुद्द्यांचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानले.

# मृदंगाचार्य संकेत महाराज आरोटे यांना 'संगीत साधक पुरस्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. गुरुवर्य बापूरावजी धामणीकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'संगीत साधक पुरस्कार' श्री अगस्ती ऋषी अध्यात्मिक गुरुकुल, अकोलेचे संस्थापक-अध्यक्ष ह.भ.प. मृदंगाचार्य संकेत महाराज आरोटे यांना प्रदान करण्यात आला.




पुणे येथील कोंढवा येथे ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पानसरे गुरुजी यांच्या हस्ते येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका सौ. रंजनाताई टिळेकर, उद्धव बापू शिंदे, ऋषी पानसरे सह अनेक मान्यवर उपस्थित होते. संकेत महाराज आरोटे हे वारकरी संप्रदायातील नामवंत मृदंग व पखवाज वादक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत. राज्यभर होणाऱ्या कीर्तन, भजन, हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या पखवाज वादनाची साथ अत्यंत मानाची समजली जाते. समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या झी टॉकीजवरील कीर्तन कार्यक्रमांनाही साथसंगत केली असून अनेक नामवंत कीर्तनकार व भजनसम्राटांसोबत ते सातत्याने संगीतसेवा बजावत आहेत. आरोटे यांनी पखवाज व तबला विषयात विशारद, संगीत विषयात एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. संगीत क्षेत्रातील त्यांची प्रामाणिक व निष्ठापूर्ण साधना, पखवाज वादनावरील उत्कृष्ट प्रभुत्व आणि वारकरी संप्रदायाच्या सेवेसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदाना साठी हा पुरस्कार मिळाला आहे.

त्यांच्या या यशाबद्दल समाजप्रबोधनकार राष्ट्रीय धर्माचार्य ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर, अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ, विश्वस्त ह.भ.प. दीपक देशमुख तसेच अकोले व संगमनेर तालुक्यातील कीर्तनकार, प्रवचनकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विरोधात आंदोलन केले म्हणून 'जेन झी' ला देशद्रोही ठरविणे चुकीचे

## सरसंघचालक मोहन भागवत यांनी टोचले कान



मुंबई (वृत्तसंस्था)

जनरेशन झेड आणि जनरेशन अल्फा हे जुन्या पिढीपेक्षा अधिक देशभक्त आणि प्रामाणिक आहेत. आपण त्यांचे ऐकले पाहिजे. त्यांच्याशी संवादाचा अभाव होता, म्हणूनच दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन झाले. जेन झी आपलेच लोक आहेत. जर त्यांनी एखाद्या गोष्टीसाठी आंदोलन केले तर ते चुकीचे कसे ? त्यांचे ऐकून घ्यायला हवे. आंदोलन केले म्हणून ते देश विरोधी किंवा अँटी नॅशनल ठरत नाहीत, असे महत्त्वाचे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. मुंबईतील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्रात आयोजित एका कार्यक्रमात भागवत बोलत होते. इंडिया इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आपल्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त याचे आयोजन करत आहे.

आंदोलन करणे चुकीचे आहे का, असे विचारले असता मोहन भागवत म्हणाले, आंदोलन हा संवादाचाच एक प्रकार आहे. आपण इथे बसून जसे बोलतो आहोत. त्यात मला मुद्दे समजत आहेत, तुम्हाला समजत आहेत. नाहीतर वाद होईल. लोकशाहीत आंदोलन करणे हे काही गैर नाही. आंदोलन करण्यात काहीही गैर नाही. पण त्याचा उपयोग हा कुठल्याही विभाजनासाठी होता कामा नये. जेन झीने जे आंदोलन केले, त्याचा उद्देश योग्य होता. भारताच्या शिक्षण धोरणात बऱ्याच गोष्टी होणे गरजेचे आहे. त्या होत नौहीत, त्याची चर्चा होते. त्यामुळे संवाद हा असलाच पाहिजे. संवाद साधून जर गोष्टी साध्य होत नसतील काय करायचे हा माग पुढचा आहे, असे मत भागवत यांनी व्यक्त केले. शिक्षण हा काही व्यावसायिक धंदा नाही. त्यासाठी सुलभ पायाभूत सुविधा असायला हव्यात. सरकारने संपूर्ण शिक्षण व्यवस्था चालवावी, असे कोणीही म्हटलेले नाही. आपल्यालाही सहकार्य करण्याची गरज आहे. तरच सुधारणा होईल. अभ्यासक्रमावर नंतर चर्चा व्हायला हवी.

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Awari Parigha Dasharath
TO NEW NAME
Kanawade Reshma Bhaskar
Adress –At –Mabad Post- Dhamangaon Awari, Tal- Akole Dist-A.Nagar 422601
By Notary No - 381/ 2026
Date – 21/07/2026

# आठवणीतील शाळा यशोगाथा

## जि.प. प्रा. शाळा नांदूर खंदरमाळ

ज्ञानरचनावादाची नवी पहाट आणि गुणवत्तेचा ध्यास घेऊन २९ मे २०१८ रोजी मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदूर खंदरमाळ येथे रुजू झाले. ८ सप्टेंबर २०२५ पर्यंतचा हा प्रदीर्घ प्रवास माझ्या शिक्षक जीवनातील सुवर्णकाळ ठरला. बघता बघता ही शाळा सोडून आज एक वर्ष होत आले. पण त्या शाळेतील अत्यंत आनंददायी आठवणी आजही मनामध्ये रेंगाळत आहेत. अत्यंत गुणी विद्यार्थी,पालक आणि व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने गाठलेले यशाचे शिखर आजही आनंद देऊन जात आहे. या शाळेने मला केवळ एक शिक्षिका म्हणूनच नव्हे, तर एक संवेदनशील आणि ध्येयवादी व्यक्ती म्हणून घडवले. यशाच्या उंच शिखरावर पोहोचण्यासाठी आवश्यक असणारे बळ मला याच भूमीने दिले.

स्वच्छता आणि गुणवत्तेचा ध्यास

सन २०२३-२४ हे वर्ष आमच्या शाळेसाठी ऐतिहासिक ठरले. 'मुख्यमंत्री माझी शाळा, स्वच्छ सुंदर शाळा' या राज्यव्यापी उपक्रमात सर्व सहकाऱ्यांच्या साथीने आम्ही अहोरात्र मेहनत घेतली. जीव ओतून केलेल्या या कामाची पावती म्हणून आमच्या शाळेला तालुक्यात प्रथम क्रमांक आणि जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळाला. तब्बल ३,००,००० (तीन लाख रुपये) चे घवघवीत पारितोषिक मिळाले.

उपक्रमशीलता आणि विद्यार्थ्यांचे यश

शाळेत केवळ भौतिक विकास न करता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले: शैक्षणिक व स्पर्धा परीक्षा: मंथन, लक्षवेध एक्सलंट ओलंपियाड,शिष्यवृत्ती व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेले उज्वल यश. क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम: क्रीडा स्पर्धांमध्ये मुलांचे चमकदार प्रदर्शन, वार्षिक स्नेहसंमेलन, हस्तकला आणि चित्रकला प्रदर्शन. जिल्हा परिषद अहिल्यानगर आयोजित विविध गुणदर्शन स्पर्धेत मी स्वतः तयार करून बसवलेले महाराष्ट्राची लोकधारा हे नृत्य स्पर्धेचे आकर्षण ठरले.या नृत्याने सर्वांची मने जिंकून घेतली होती.

पर्यावरण व स्वच्छता मोहीम: वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती आणि डिजिटल स्वच्छता उपक्रम.

या सर्व यशामागे मुख्याध्यापक श्री. भाऊसाहेब भागवत सर आणि सहाय्यक शिक्षक श्री. संपत मोरे सर यांचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. ८ सप्टेंबर २०२५ रोजी शाळा सोडताना मन भावनांनी दाटून आले होते. भूतकाळातील आठवणींचा पट डोळ्यांसमोर तरळत होता, पण सोबतीला नव्या ठिकाणी काम करण्याचा उत्साहही होता.

आज मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धांदरफळ खुर्द येथे कार्यरत आहे. नांदूर खंदरमाळ येथील अनुभवाच्या पाठीशी मिळालेल्या शिदोरीवरून येथेही विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे, धांदरफळ खुर्द येथे देखील उपक्रम राबवताना पालकांचे अत्यंत मोलाचे आणि सुंदर सहकार्य लाभत आहे. पालकांचा हा सक्रिय सहभागच माझ्या कामाला नवी ऊर्जा देतो. नांदूर खंदरमाळ शाळेने दिलेली यशाची आणि अनुभवाची ही शिदोरी मला भविष्यातही शैक्षणिक कार्यात सदैव मार्गदर्शक ठरेल!



**श्रीमती निता शिवाजी सावंत (उपाध्यापिका)**

**सध्या कार्यरत: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धांदरफळ खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

कविता

माझी स्वच्छ-सुंदर शाळा


सुंदर आमची शाळा, सुंदर आमचे अंगण,
ज्ञानाच्या या बागेमध्ये रोज फुले नंदनवन.
स्वच्छतेचा ध्यास आमचा, गुणवत्तेची कास,
येथे घडतो विद्यार्थ्यांचा सुंदर उज्वल श्वास.
झाडे-वेली फुलली येथे, हसती रंगीबेरंगी फुले,
शिस्तीमध्ये बागडती ही आमची गुणी मुले.
कष्टाचे हे फळ मिळाले,
यशाचा हा ध्वज फडकवला,
स्वच्छ-सुंदर शाळेचा हा मंत्र जगी गुंजवला!
निरोपाचे क्षण आणि नवा प्रवास



# प्रवेश परीक्षांमधील टक्केवारी आणि पर्सेंटाइल : संकल्पना व फरक

संगमनेर -

दरवर्षी लाखो विद्यार्थी स्पर्धात्मक प्रवेश परीक्षा देतात. मात्र, टक्केवारी आणि शतकी स्थानांक (पर्सेंटाइल) या दोन्ही संज्ञांचा अर्थ एकच असल्याचा गैरसमज अनेकदा केला जातो. प्रत्यक्षात या दोन्ही संज्ञा विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे वेगवेगळे पैलू स्पष्ट करतात. टक्केवारी विद्यार्थ्याने एकूण गुणांपैकी किती गुण मिळविले हे दर्शवते, तर शतकी स्थानांक त्या विद्यार्थ्याने इतर सर्व परीक्षार्थ्यांच्या तुलनेत कोणते स्थान मिळविले, हे स्पष्ट करतो.




अलीकडे सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) संदर्भात सुमारे १,२०० विद्यार्थ्यांना बारावीच्या टक्केवारीच्या तुलनेत अधिक शतकी स्थानांक मिळाल्याने चर्चा सुरू झाली आहे. मात्र, कोणताही ठोस निष्कर्ष निघण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्यांची माहिती सार्वजनिक करून तर्क-वितर्क मांडणे योग्य नाही. अशा चर्चांचा विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांवरही मानसिक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कोणतेही आरोप अथवा निष्कर्ष सक्षम तपासानंतरच काढणे आवश्यक आहे.

बारावीच्या मंडळ परीक्षेतील गुण आणि प्रवेश परीक्षेतील कामगिरीतील फरक केवळ सीईटीमध्येच नव्हे, तर संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) आणि इतर स्पर्धात्मक परीक्षांमध्येही दिसून येतो. अनेक विद्यार्थी विविध प्रवेश परीक्षांमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करतात. त्यामुळे केवळ एका परीक्षेच्या आधारे कोणत्याही विद्यार्थ्याबाबत शंका उपस्थित करणे योग्य ठरत नाही.

चर्चेत असलेली ही प्रकरणे जवळपास १८ लाख परीक्षार्थ्यांपैकी केवळ ०.००७ टक्क्यांपेक्षाही कमी आहेत. त्यामुळे काही मोजक्या घटनांच्या आधारे संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य ठरणार नाही. व्यापक आकडेवारी आणि वस्तुनिष्ठ विश्लेषण लक्षात घेऊनच निष्कर्ष काढणे आवश्यक आहे.

कोटा, दिल्ली, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांतील नामांकित प्रशिक्षण संस्था विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक प्रवेश परीक्षांसाठी स्वतंत्र तयारी करून घेतात. यावरूनच मंडळ परीक्षा आणि स्पर्धात्मक प्रवेश परीक्षांचे उद्दिष्ट वेगवेगळे असल्याचे स्पष्ट होते. या परीक्षा विद्यार्थ्यांची विश्लेषण क्षमता, समस्या सोडविण्याचे कौशल्य, अभिक्षमता, वेग आणि समान परीक्षेच्या वातावरणातील कामगिरी यांचे मूल्यमापन करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. म्हणूनच देशभरातील विद्यार्थी या परीक्षांसाठी स्वतंत्र आणि विशेष तयारी करतात.

त्यामुळे बारावीच्या टक्केवारीची थेट प्रवेश परीक्षेतील शतकी स्थानांकाशी तुलना करणे योग्य नाही. टक्केवारी आणि शतकी स्थानांक यांतील मूलभूत फरक समजून घेतल्यास विद्यार्थी, पालक आणि नागरिक परीक्षा निकालांचा अधिक अचूक अर्थ लावू शकतील. तथ्ये, आकडेवारी आणि योग्य संदर्भ यांच्या आधारे होणारी माहितीपूर्ण चर्चा स्पर्धात्मक परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्यास आणि प्रामाणिकपणे यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा योग्य सन्मान करण्यास महत्त्वाची ठरते.

## संपादकीय...

# आरोग्यदायी सवयींची सुरुवात शाळेपासून

आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीत मुलांच्या आहाराच्या सवयींमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत. घरगुती पौष्टिक जेवणापेक्षा पिझ्झा, बर्गर, नूडल्स, फ्रेंच फ्राईज, चिप्स, चॉकलेट, शीतपेये आणि इतर पॅकेज्ड पदार्थांकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल ही चिंतेची बाब बनली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यातील सर्व शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक फूड विक्रीवर बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि स्वागतार्ह आहे. हा निर्णय केवळ खाद्यपदार्थांवरील निर्बंध नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण आणि निरोगी पिढी घडविण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

आज लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, दातांचे विकार, पचनाच्या समस्या आणि इतर अनेक जीवनशैलीजन्य आजार विद्यार्थ्यांमध्ये वाढताना दिसत आहेत. यामागे अनियमित आहार आणि जंक फूडचे वाढते सेवन हे प्रमुख कारण मानले जाते. या पदार्थांमध्ये साखर, मीठ, तेल, कृत्रिम रंग, संरक्षक रसायने आणि ट्रान्स फॅटचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे शरीराला आवश्यक पोषणमूल्ये मिळण्याऐवजी विविध आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. जागतिक आरोग्य संघटनेनेही बालकांमधील वाढत्या लठ्ठपणाबाबत अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. शाळा हे केवळ ज्ञानदानाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाचेही केंद्र आहे. त्यामुळे शाळेच्या परिसरात आरोग्यदायी वातावरण असणे अत्यंत आवश्यक आहे. शाळेच्या प्रवेशद्वाराबाहेर सहज उपलब्ध होणारे फास्ट फूड विद्यार्थ्यांना आकर्षित करते आणि ते पौष्टिक आहारापासून दूर जातात. त्यामुळे शाळांच्या आसपास जंक फूड विक्रीवर निर्बंध आणण्याचा निर्णय योग्य दिशेने टाकलेले पाऊल मानावे लागेल. मात्र, केवळ बंदी घालून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. विद्यार्थ्यांना आरोग्यदायी पर्याय उपलब्ध करून देणे तितकेच आवश्यक आहे. शाळांमधील कॅंटीनमध्ये फळे, दूध, ताक, मोड आलेली कडधान्ये, पौष्टिक नाश्ता, ताजे फळांचे रस आणि संतुलित आहार उपलब्ध करून देण्यावर भर दिला पाहिजे. आरोग्यदायी पदार्थ सहज उपलब्ध झाले, तर विद्यार्थ्यांमध्ये योग्य आहाराच्या सवयी विकसित होण्यास मदत होईल. या निर्णयाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी स्थानिक प्रशासन, शाळा व्यवस्थापन, पालक आणि विक्रेते यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा शाळांच्या गेटबाहेर हातगाड्यांवर किंवा छोट्या दुकानांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे पदार्थ विकले जातात. अशा ठिकाणी नियमित तपासणी करून नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे गरजेचे आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली, तरच या निर्णयाचा अपेक्षित परिणाम दिसून येईल. यामध्ये पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. अनेक पालक मुलांच्या हट्टापोटी रोज खाऊसाठी पैसे देतात. त्यामुळे मुलांना सहजपणे जंक फूड खरेदी करण्याची सवय लागते. त्याऐवजी घरातून पौष्टिक डबा देणे, संतुलित आहाराचे महत्त्व समजावून सांगणे आणि स्वतःही आरोग्यदायी जीवनशैलीचे पालन करणे आवश्यक आहे. लहानपणी लागलेल्या चांगल्या सवयी आयुष्यभर टिकून राहतात. त्यामुळे मुलांच्या आहाराकडे पालकांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शाळांमध्येही पोषण शिक्षणाला अधिक महत्त्व दिले पाहिजे. संतुलित आहाराचे महत्त्व, अन्नातील पोषक घटक, आरोग्यदायी जीवनशैली आणि व्यायामाचे फायदे विद्यार्थ्यांना लहानपणापासून समजावून सांगितले पाहिजेत. नियमित आरोग्य तपासणी, योग, खेळ, व्यायाम आणि मैदानी उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य अधिक सक्षम होईल. मोबाईल, टीव्ही आणि संगणकासमोर वाढणारा वेळ कमी करून शारीरिक हालचाली वाढविणेही आजच्या काळाची गरज आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी हेच सर्वात मोठे आव्हान आहे. अनेक वेळा चांगले नियम तयार होतात; मात्र त्यांची काटेकोर अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शिक्षण विभाग यांनी समन्वयाने काम करून नियमित तपासणी, जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यांचा योग्य समतोल राखला पाहिजे. तसेच विद्यार्थी, पालक आणि विक्रेत्यांमध्ये आरोग्यदायी आहाराबाबत व्यापक जनजागृती करणेही आवश्यक आहे. विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांचे आरोग्य चांगले असेल, तरच देशाचा विकास अधिक सक्षमपणे होऊ शकतो. त्यामुळे शाळांभोवती जंक फूड विक्रीवर घातलेले निर्बंध हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून समाजाच्या आरोग्यदायी भविष्यासाठी उचललेले दूरदृष्टीचे पाऊल आहे. शासनाचा हा निर्णय प्रभावीपणे राबविला गेला आणि पालक, शिक्षक, प्रशासन व समाजाने त्याला सकारात्मक साथ दिली, तर भविष्यात अधिक निरोगी, सशक्त आणि जागरूक पिढी घडविण्याचे उद्दिष्ट निश्चितच साध्य होईल.

## व्यसनाला नाही म्हणा; स्वप्नांना होकार द्या

# डॉ. कुणाल सोनवणे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तारुण्य हा वादळी वाऱ्याचा काळ आहे. या वयात मोठी स्वप्ने पाहण्याची, ती पूर्ण करण्यासाठी धडपडण्याची आणि स्वतःला घडविण्याची ऊर्जा असते. मात्र या ऊर्जेला योग्य दिशा देण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक आहे. व्यसनाला सुरुवात कुतूहलातून होते; मात्र त्याचे परिणाम संपूर्ण आयुष्यावर होऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून कटाक्षाने दूर राहून आपल्या स्वप्नांना आणि ध्येयांना प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन महाराष्ट्र पोलिस दलातील पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांनी श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर बोलत असताना केले.

यावेळी व्यासपीठावर शालेय समिती सदस्य प्रा. दिलीप सांगळे, पर्यवेक्षक आप्पासाहेब गुंजाळ, प्रा. आप्पासाहेब थिटमे, प्रा. सारिका शिंदे आदी उपस्थित होते. डॉ. सोनवणे म्हणाले, या वयात आपल्याला सगळे समजते, आपण मोठे झालो आहोत असे वाटते. गाडी चालवावीशी वाटते, स्वतःचे निर्णय घ्यावेसे वाटतात. मात्र स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीही आली पाहिजे. अल्पवयात केलेल्या चुकीची शिक्षा अनेकदा स्वतःला नव्हे, तर आई-वडिलांना भोगावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियम पाळण्याबरोबरच कायद्याचे भान ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

१६ ते २५ वर्षांचा काळ हा आयुष्य घडविण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात घेतलेले निर्णय भविष्यातील आयुष्याला दिशा देतात. अभ्यासाकडे दुर्लक्ष करून वेळ वाया घालवला, तर पुढील प्रवास कठीण होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे एका व्यक्तीकडून अनेक व्यक्तींची कामे केली जात आहेत. त्यामुळे भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि वाढती स्पर्धा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी करिअरकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. व्यसनाधीनतेबाबत विद्यार्थ्यांना सजग करताना डॉ. सोनवणे यांनी मित्रांच्या दबावाला बळी न पडण्याचे आवाहन केले. सिगारेट, तंबाखू, गुटखा, दारू किंवा इतर कोणतेही व्यसन सुरुवातीला क्षुल्लक वाटते; मात्र हळूहळू ते व्यक्तीच्या आरोग्यासोबतच शिक्षण, कुटुंब आणि भवितव्यावर परिणाम करते. 'एकदा करून पाहू' या विचारापासूनच दूर राहा. आपल्या आयुष्याचे नियंत्रण व्यसनाच्या हातात देऊ नका, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. मोबाईलच्या वाढत्या वापराबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना सजग केले. मोबाईल हे साधन आहे, आयुष्याचा मालक नाही. त्याचा उपयोग ज्ञान मिळविण्यासाठी करावा; मात्र अनावश्यक वापरामुळे आपले लक्ष विचलित होऊ देऊ नका, असा सल्ला त्यांनी दिला. मोठी स्वप्ने पूर्ण करायची असतील तर मोठ्या प्रमाणात वाचन केले पाहिजे. चांगली पुस्तके वाचा. वाचनामुळे विचारांची समृद्धी होते, ज्ञान वाढते आणि एकाग्रता निर्माण होते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले.

# अहिल्यानगर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ९८१ पदांना मंजुरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयासाठी आवश्यक पदनिर्मितीस मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्या अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला असून रुग्णालयाच्या कार्यक्षम संचालनासाठी एकूण ९८१ पदांची निर्मिती टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. विधान परिषद सभापती मा प्रा राम शिंदे यांनी यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता.

राज्यातील निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे तसेच वैद्यकीय शिक्षणाच्या संधी वाढविणे या उद्देशाने राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता.

शासन निर्णयानुसार रुग्णालयासाठी नियमित स्वरूपातील गट-अ, गट-ब व गट-क मधील ५१५ पदे तसेच बाह्यस्रोताद्वारे (आउटसोर्सिंग) ४६६ मनुष्यबळ सेवा अशा एकूण ९८१ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे. ही पदे चार टप्प्यांत भरली जाणार असून पहिल्या टप्प्यातील पदनिर्मिती तत्काळ करण्यात येणार आहे.

या पदनिर्मितीमुळे वैद्यकीय अधीक्षक, निवासी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, अधिपरिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माता, लिपिक, वाहनचालक तसेच विविध सहाय्यक व तांत्रिक पदांसह अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाच्या सर्व विभागांचे सक्षम मनुष्यबळ उभारून नागरिकांना अधिक प्रभावी व दर्जेदार आरोग्यसेवा देण्यास मदत होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील आरोग्य सुविधा बळकट करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून वैद्यकीय शिक्षण, आरोग्यसेवा आणि स्थानिक रोजगारनिर्मितिच्या संधी यांना यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

# अहिल्यानगर-कल्याण रेल्वेमार्गाला मंजुरीची मागणी

### - खा. निलेश लंके



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर (अहमदनगर) - माळशेज घाट - कल्याण या २४६ किलोमीटर लांबीच्या महत्त्वाकांक्षी नवीन रेल्वेमार्गाला केंद्र शासनाने तातडीने प्रशासकीय मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केंद्रीय रेल्वेमंत्री मा. श्री. अश्विनी वैष्णव यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हा रेल्वेमार्ग केवळ अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचा नसून मुंबई, अहिल्यानगर, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण या संपूर्ण भागाच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीला चालना देणारा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील महत्त्वाच्या भागांना थेट रेल्वे संपर्क मिळून वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे रेल्वे वाहतुकीचा वेग वाढणार असून प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी नवीन पर्याय उपलब्ध होणार आहेत. विद्यमान रेल्वेमार्गांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल. तसेच मालवाहतुकीचा खर्च कमी झाल्याने उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राला मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर (डीएमआयसी) प्रकल्पालाही हा रेल्वेमार्ग पूरक ठरणार असून, औद्योगिक गुंतवणूक वाढविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी उत्पादन, लघु व मध्यम उद्योग, पर्यटन आणि निर्यात क्षेत्राला यामुळे नवी बाजारपेठ उपलब्ध होण्याची शक्यता आहे. अहिल्यानगर, कल्याण आणि कोकण विभागातील संपर्क अधिक मजबूत झाल्यास रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळेल.

## ग्रामपंचायत केळुंगण, ता. अकोले, जि. अ.नगर

### जाहीर निविदा अंतर्गत खुली निविदा सुचना क्र. /२०२६ -२०२७

ग्रामपंचायत ग्रामपंचायत केळुंगण ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे मार्फत योग्य त्या जिल्हा परिषद ठेकेदार अंतर्गत नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा / दरपत्रक मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून ते दि. १७/०८/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शासकिय सुट्टी वगळून व कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच दि. १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा नंतर निविदा उघडण्यात येतील.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | साहित्य संख्या | बयाणा रक्कम | कालावधी | कोऱ्या निविदा संचाची किंमत | अधिकृत ठेकेदाराच वर्ग पुरवठा साहित्याचे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अंगणवाडी दुरूस्ती करणे (पेसा सन २०२५ -२०२६) | ६०५०३ | - | ६०५ | ३ महिने | २००/- | वर्ग ८ व पुढील |

अटी व शर्ती - १) सदर काम पूर्ण करणेच कालावधी ३ महिने राहील २) निविदा/ दरपत्रक या तांत्रिक लिफाफा व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. ३) निविदा / दरपत्रक अटि व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा मधिल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीने ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. ४) लिफाफाक्र १ शक्यतो निविदेमधील नमूद कालावधी व वेळेत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल. सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेत निविदा उघडण्यात येतील.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. केळुंगण, ता. अकोले, जि. अ.नगर**

**सरपंच**
**ग्रा.पं. केळुंगण, ता. अकोले, जि. अ.नगर**

### CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
TANESH AMREKLAL PANJABI
TANESH AMRIKLAL PANJABI

NEW NAME AS
TANESH AMREKLAL PAPDEJA

Address-
indiranagar galli no - 1
SANGAMNER 422605

## लिलाव नोटीस

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी, ता. संगमनेर जि.अ.नगर**

**शाखा- मेनरोड, संगमनेर**

लिलाव दिनांक - १०/०८/२०२६
वेळ सकाळी - ११.०० वाजता
ठिकाण - सहकारमहर्षी भा. थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. शाखा मनेरोड

**कर्जदाराने वारंवार सुचना देवूनही थकीत कर्जाची परतफेड अद्याप केलेली नाही. त्यांच्या सोनेतारणातील दागिण्यांचा लिलाव करण्यात येते आहे.**

कर्ज खा. नं. ००४/१८७/९१७५
कर्जदाराचे नाव - श्री. संतोष चिमाजी साबळे
थकीत कर्ज रक्कम - ३१/०७/२०२६ अखेर रू. १७३८७ व पुढील दिवसाचे होणारे व्याज

अटी व शर्ती
१) लिलावात सर्वाधिक बोली लावणाऱ्यास दागिने विकले जातील.
२) बँकेला कोणतीही बोली स्विकारण्यास व नाकारण्यास अधिकार राहील
३) लिलावाच्या अटी बँकेच्या नियमानुसार राहील.

## पाहिजेत

**श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्**
**श्री गणेश टायर्स**
**श्री गणेश ऑइल सेंटर**
**या फर्मसाठी**

**अकाऊंटंट - 2 जागा**
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक

कामाचा अनुभव आवश्यक
**८९९९८६२७५९**

## त्वरित भरती आजच संधीचा लाभ घ्या

**सर्व्हिस ॲडव्हायझर - 01 जागा**
शैक्षणिक पात्रता :- ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल डिप्लोमा
अनुभव :- फ्रेशर किंवा कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**स्पेअर पार्ट्स बिलिंग - 01 जागा**
कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये स्पेअर पार्ट्स बिलिंगचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.

इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.

पत्ता - घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अ.नगर
**मो. ९४२२७३५५६४**







## पाहिजेत

**एक पुरुष कर्मचारी/मुलगा**
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
**श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल**
नवीन नगर रोड संगमनेर
- संपर्क -
**7972999316**

## फ्लॅट विकणे आहे

**2 BHK फ्लॅट विकणे आहे**
**नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह**
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
**8788945208**
**8208223721**

## फॅकल्टी पाहिजे

**अगस्ती अकॅडमी संगमनेर**

ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
**पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स**
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.

**AMVI - 461 जागा MPSC** (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.

सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा

अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन

पत्ता : नाशिक - पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
**6005401510**
**9209645727**

## दिनविशेष

२००८: ऑलिम्पिक — २९व्या उन्हाळी ऑलिम्पिक खेळ बीजिंग, चीन येथे सुरु झाले.

२०००: वेदमूर्ती मोरेश्वर घैसास — यांना महाराष्ट्र राज्याचा महाकवी कालिदास संस्कृत-साधना पुरस्कार जाहीर.

१९९८: संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (DRDO) — प्रयोगशाळा औद्योगिक क्षेत्रासाठी खुल्या झाल्या.

१९९४: डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमन, पुणे ( सुरू झाले.

१९९१: वॉर्सा रेडिओ मास्ट — एका वेळी बांधलेले सर्वात उंच बांधकाम, कोसळले.

१९९०: आखाती युद्ध (Gulf War) — इराकने कुवेतवर कब्जा केला. यामुळे लवकरच आखाती युद्ध सुरु होणार होते.

१९८९: स्पेस शटल प्रोग्राम — STS-28 मिशन: स्पेस शटल कोलंबिया पाच दिवसांच्या गुप्त लष्करी मोहिमेवर निघाले.

१९४२: भारत छोडो आंदोलन, क्रांतिदिन — भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या क्रांतीचे पर्व मुंबई येथून सुरु झाले.

## जन्म

१९८९: प्राजक्ता माली — मराठी अभिनेत्री, नृत्यांगना आणि कवयित्री, मराठी मनोरंजन क्षेत्रातील लोकप्रिय कलाकार — विविध मराठी मनोरंजन पुरस्कार

१९८८: रिंकू सिंग राजपूत — भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू आणि माजी व्यावसायिक बेसबॉल खेळाडू

१९८१: रॉजर फेडरर — स्विस लॉन टेनिस खेळाडू

१९७८: मोहम्मद वसीम — पाकिस्तानी क्रिकेटपटू

१९६८: ऍबे कुरिविला — भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक

१९६४: ज्युसेप्पे कॉन्टे — इटली देशाचे पंतप्रधान

१९५२: सुधाकर राव — भारतीय क्रिकेटपटू

१९५१: मोहम्मद मोर्सी — इजिप्त देशाचे ५वे राष्ट्राध्यक्ष, अभियंते, शैक्षणिक आणि राजकारणी (निधन: १७ जून २०१९ )

## मृत्यू

८६९: लोथेर II — फ्रँकिश देशाचे राजा (जन्म: ८३५ )

२०२२: उमा पेम्माराजू — भारतीय-अमेरिकन पत्रकार आणि न्यूज अँकर (जन्म: ३१ मार्च १९५८ )

२००५: जॉन एच. जॉन्सन — जॉन्सन पब्लिशिंग कंपनीचे संस्थापक (जन्म: १९ जानेवारी १९१८ )

१९९९: गजानन नरहर सरपोतदार — चित्रपट निर्माते वव दिग्दर्शक

१९९८: सुमती क्षेत्रमाडे — लेखिका व कादंबरीकार

१९९६: नेव्हिल फ्रान्सिस मॉट — इंग्रजी भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: ३० सप्टेंबर १९०५ )

१९८०: पॉल ट्रिकेट — कॅनेडियन जनरल — व्हिक्टोरिया क्रॉस (जन्म: २ एप्रिल १९१० )

१९५०: फर्गस मॅकमास्टर — ऑस्ट्रेलियन उद्योगपती, Qantas ऐरलाईन्सचे संस्थापक (जन्म: ३ मे १८७९ )

१९४८: क्लॉड अ‍ॅश्टन जोन्स — अमेरिकन अ‍ॅडमिरल — मेडल ऑफ ऑनर विजेते (जन्म: ७ ऑक्टोबर १८८५ )

१८९७: व्हिक्टर मेयर — जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ८ सप्टेंबर १८४८ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०८ ऑगस्ट**

# १९४२ चे भारत छोडो आंदोलन स्वातंत्र्याच्या निर्णायक लढ्याची सुरुवात



९ ऑगस्ट १९४२ हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी मुंबईतील गोवालिया टँक मैदान (आजचे ऑगस्ट क्रांती मैदान) येथे महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'भारत छोडो' आंदोलनाची घोषणा करण्यात आली. ब्रिटिशांनी तात्काळ भारत सोडावा, या निर्धाराने भारतीय जनतेने सुरू केलेला हा लढा स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिशेने निर्णायक ठरला. त्यामुळे हा दिवस 'क्रांतिदिन' म्हणून साजरा केला जातो.८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात 'भारत छोडो' ठराव मंजूर करण्यात आला. या वेळी महात्मा गांधींनी "करा किंवा मरा" (Do or Die) हा ऐतिहासिक मंत्र दिला. त्यांनी भारतीयांना अहिंसेच्या मार्गाने ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक जनआंदोलन उभारण्याचे आवाहन केले.आंदोलनाची घोषणा होताच ब्रिटिश सरकारने महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासह अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक केली. मात्र, नेतृत्व तुरुंगात असतानाही देशभरातील लाखो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि महिलांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन सुरू ठेवले. अनेक ठिकाणी मोर्चे, संप, निदर्शने आणि ब्रिटिश प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन झाले. या आंदोलनात हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी तुरुंगवास भोगला, तर अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.भारत छोडो आंदोलन तात्काळ स्वातंत्र्य मिळवून देऊ शकले नाही; मात्र या आंदोलनामुळे ब्रिटिश सत्तेचा पाया हादरला. भारतीय जनतेचा स्वातंत्र्याचा निर्धार आणि एकजूट जगासमोर ठळकपणे दिसून आली. यानंतर ब्रिटिश सरकारला भारतावर दीर्घकाळ राज्य करणे अशक्य असल्याची जाणीव झाली आणि अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.क्रांतिदिन हा केवळ इतिहासातील एक दिवस नसून देशभक्ती, त्याग, संघर्ष आणि स्वातंत्र्याच्या अमूल्य मूल्यांची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे.

# रिंकू सिंग राजपूत : संघर्षातून जागतिक क्रीडा विश्वात झेप

**जन्मदिन विशेष**

रिंकू सिंग राजपूत यांचा जन्म ८ ऑगस्ट १९८८ रोजी उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यातील एका अत्यंत सामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबात झाला. वडील ट्रक चालक, तर कुटुंब मोठे असल्यामुळे लहानपणापासूनच त्यांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी जागतिक क्रीडा क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.रिंकू यांना सुरुवातीला भालाफेक आणि इतर अ‍ॅथलेटिक्स प्रकारांमध्ये रस होता. २००८ मध्ये अमेरिकन दूरचित्रवाणीवरील 'द मिलियन डॉलर आर्म' या स्पर्धेत त्यांनी विजेतेपद मिळवले. या स्पर्धेचा उद्देश भारतातून उत्कृष्ट बेसबॉल पिचर शोधणे हा होता. या यशामुळे त्यांना अमेरिकेत प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली आणि ते पिट्सबर्ग पाइरेट्स (Pittsburgh Pirates) या मेजर लीग बेसबॉल संघटनेशी करार करणारे पहिले भारतीय खेळाडू ठरले. त्यांनी अमेरिकेतील मायनर लीगमध्ये अनेक वर्षे खेळून भारताचे प्रतिनिधित्व केले.बेसबॉलमधील कारकीर्दीनंतर रिंकू सिंग यांनी व्यावसायिक कुस्ती क्षेत्रात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. २०१८ मध्ये त्यांनी WWE सोबत करार केला. त्यानंतर त्यांनी 'वीर महान (Veer Mahaan)' या नावाने कुस्तीविश्वात दमदार एन्ट्री केली. त्यांच्या उंच बांध्यामुळे, शक्तिशाली व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रभावी खेळामुळे त्यांनी अल्पावधीतच चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. WWE च्या RAW आणि NXT



सारख्या लोकप्रिय स्पर्धांमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व करत अनेक लक्षवेधी सामने खेळले.रिंकू सिंग यांचा जीवनप्रवास हा संघर्षातून यशाकडे वाटचाल करणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जागतिक स्तरावर पोहोचण्यासाठी केवळ प्रतिभा नव्हे, तर सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि ध्येयाप्रती निष्ठा किती महत्त्वाची असते, हे त्यांनी आपल्या आयुष्यातून सिद्ध करून दाखवले.आज रिंकू सिंग राजपूत हे केवळ व्यावसायिक कुस्तीपटू किंवा माजी बेसबॉल खेळाडू म्हणूनच नव्हे, तर भारतातील युवकांसाठी प्रेरणास्थान म्हणूनही ओळखले जातात. ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातील युवकाने जागतिक क्रीडा विश्वात भारताचा झेंडा उंचावत इतिहास घडवला. त्यांच्या यशामुळे अनेक भारतीय तरुणांना आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# सरळ रेल्वेमार्गासाठी जनआंदोलन - दशरथ सावंत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे मूळ संकल्पित मार्गानेच व्हावी यासाठी अकोले - संगमनेर तालुक्यातील जनतेच्यावतीने प्रचंड मोठे जनआंदोलन करण्याचा इशारा शेतकरी नेते दशरथ सावंत यांनी दिला.



येत्या काही दिवसांत त्यांच्या मूळ गावी रुंभोडी येथे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्याच्या दृष्टीने झालेल्या चर्चेत त्यांनी पत्रकारांना ही माहिती दिली. पुढे बोलताना ते म्हणाले, नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वेची मागणी फार जुनी आहे. त्यावेळी खेड ते नाशिक या मार्गावरील

व खासदारांनी आमदारांनी हा प्रश्न त्याकाळात ला-वून धरला होता. मधल्या काळातही विद्यमान खासदारांनी ही मागणी सातत्याने संसदेत लावून धरली. मात्र हा रेल्वेमार्ग २०१२ ला मंजूर असून त्याचा सर्वे झाला. मात्र येत्या काही वर्षात हा विषय ऐरणीवर आल्याने तीनही जिल्ह्यातील अनेक तालुक्यांचा व गावांचा जिव्हाळ्याचा विषय असून जनता हा प्रश्न सोडवण्यासाठी आसुस लेली आहे.

मात्र सरकारची याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका नसल्याने अकोले-संगमनेर तालुक्यात संभ्रम तयार झाला आहे. या विभागाचे नेतृत्व करणारे आमदार-खासदार यांनीच शासन पातळीवर काय निर्णय झाले त्याचे स्पष्टीकरण जनतेत येऊन द्यावे. शासन प्रतिनिधी म्हणून सरकारमधून याबाबत माहिती आणावी. संकल्पित मूळ रेल्वेमार्गासाठी आमदार-खासदारांनी आक्रमकपणे नेतृत्व करावे व जनतेचा अनेक पिढ्यांचा प्रलंबित प्रश्न त्वरित सोडवावा अशी मागणी केली आहे. अन्यथा अकोले-संगमनेर तालुक्यातील प्रचंड मोठे जनआंदोलन उभे करण्याचा इशारा सावंत यांनी दिला आहे.

# जिओ फायबरची इंटरनेट सेवा सुरू नाहीच

## समस्या मात्र वाढल्या, प्रवाशांची दिशाभूल, अपघाताचा धोका वाढला

युवावार्ता (प्रतिनिधी)

अंभोरे - ग्रामीण भागात उच्चगती इंटरनेट सेवा पोहोचविण्यासाठी उभारण्यात आलेल्या जिओ फायबर प्रकल्पाच्या कामातील निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संगमनेर-देवगाव-पिंपरणे-शिबलापूर तसेच संगमनेर-पिंपळगाव-साकूर मार्गावरील देवगाव फाटा त्रिफुली येथे जिओ फायबरचा खांब सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिशादर्शक फलकावर गेल्या वर्षभरापासून कोसळलेल्या अवस्थेत आहे. मात्र, अद्याप त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

देवगाव फाटा हा शिबलापूर, पिंपरणे, देवगाव, पिंपळगाव देपा, साकूर, राहुरी आणि शिर्डीकडे जाणाऱ्या वाहनांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. कोसळलेल्या खांबामुळे दिशादर्शक फलक झाकला गेल्याने बाहेरगावच्या प्रवाशांची दिशाभूल होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, जिओ फायबरचे काम सुरू होऊन बराच काळ झाला असला तरी अनेक ग्रामीण भागात अद्याप इंटरनेट सेवा सुरू झालेली नाही. मात्र, खांब आणि केबलमुळे विविध ठिकाणी अडथळे निर्माण झाले आहेत.

दरम्यान, देवगाव-पिंपरणे-शिबलापूर मार्गावरही सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडझुडपे, गवत, पाइपलाइनच्या कामानंतरचे खड्डे आणि धोकादायक कठड्यांमुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

कोसळलेला जिओ फायबरचा खांब तातडीने हटवून दिशादर्शक फलक पूर्ववत करावा, रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडझुडपे हटवावीत आणि खड्डे व इतर अडथळ्यांची दुरुस्ती करून मार्ग सुरक्षित करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.



# जिल्हाधिकारीपदी निवड झालेल्या प्रेरणा खवळे यांचा सन्मान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून आयएएस अधिकारी म्हणून जिल्हाधिकारीपदापर्यंत पोहोचलेल्या प्रेरणा खवळे यांचा समाजातील मुला-मुलींनी आदर्श घेऊन उच्चशिक्षित व्हावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी केले.



संगमनेर बसस्थानक येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या वतीने प्रेरणा खवळे यांचा नीलम खताळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी नीलम खताळ आणि प्रेरणा खवळे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

नीलम खताळ म्हणाल्या, समाजातील प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. जात, धर्म, पंथाच्या पलीकडे जाऊन शिक्षण आणि समाजकार्यात पुढे जाण्याची गरज आहे. प्रेरणा खवळे यांच्या यशामुळे समाजाची मान उंचावली असून, त्यांच्या आदर्शातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन मोठ्या पदांवर पोहोचावे. प्रेरणा खवळे यांच्या प्रशिक्षण काळात किंवा भविष्यात कोणतीही अडचण आल्यास आमदार अमोल खताळ त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील, असेही त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना प्रेरणा खवळे म्हणाल्या की, समाजात शिक्षणाबाबत आणखी जागरूकता निर्माण होण्याची गरज आहे. पालकांनी आपल्या मुला-मुलींना उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करावे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती ज्या उत्साहाने साजरी केली जाते, त्याच उत्साहाने शिक्षणाचाही उत्सव साजरा झाला पाहिजे. माझ्या आई-वडिलांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच मी आज या पदापर्यंत पोहोचू शकले असून, माझ्या यशाचे खरे मानकरी तेच आहेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, संगीता पुंड, सपना जाधव, आरती पगारे, रेखा गलांडे, समितीचे संस्थापक विकास जाधव, मार्गदर्शक किरण घारे, अध्यक्ष रवि आरणे, उपाध्यक्ष शुभम आव्हाड, खजिनदार राहुल जाधव यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विकास जाधव यांनी स्वागत केले, तर नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# संगमनेर तालुक्यासाठी ३५७ मेट्रिक टन युरियाचा बफर स्टॉक खुला

## आ. खताळांच्या सूचनेनंतर कृषी विभागाची कार्यवाही

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवरती शेतकऱ्यांना युरिया खता उपलब्ध व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आमदार अमोल खताळ यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना उर्वरित राहिलेला बफर स्टॉक खुला करण्या बाबतच्या सूचना दिल्या त्यानंतर कृषी विभागाने नियोजन करून ३५७ मॅट्रिक टन युरियाचा साठा खुला केला आहे



संगमनेर तालुक्यातील खरीप हंगाम २०२६-२०२७ साठी एकूण ७०० मेट्रिक टन युरिया उपलब्ध करून देण्यात आला होता त्यापैकी ३४९ मेट्रिक टन युरिया तातडीने विक्री साठी उपलब्ध करून देण्यात आला होता. दरम्यान, शेतकऱ्यांची वाढती मागणी लक्षात घेता शिल्लक संरक्षित साठ्यामधून युरिया वितरीत करण्या साठी आमदार अमोल खताळ यांनी कृषी विभागाला सूचना केले आहे

उर्वरित सुमारे ३५७ मेट्रिक टन बफर स्टॉक देखील खुला करण्यात आला असून तो आता विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.कृषी विभागा च्या या नियोजनामुळे तालुक्यात युरियाचा तुटवडा निर्माण होणार नाही तसेच शेतकऱ्यांना आवश्यकते नुसार खत उपलब्ध करण्यात होणार आहे. अधिकृत विक्रेत्यांकडूनच युरिया खरेदी करावी, कृषी सेवा केंद्र चालक शेतकर्याकडून ज्यादा दर आकारला जात असल्यास किंवा खताची कृत्रिम टंचाई निर्माण केली तर त्या कृषी सेवा केंद्राच्या लोकांवर तात्काळ कारवाई करावी आशा सूचना ही आ. खताळ यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
DTE CODE EN 5162
Sangamner, Dist : Ahilyanagar, Maharashtra, Pin - 422608
AN AUTONOMOUS INSTITUTE
Permanently Affiliated to SPPU, Pune
665+ Placement Offers
In AY 2025-26 & Still Counting...
20 LPA HIGHEST PACKAGE
ENGINEERING B. Tech Courses

| Course | | Course Code | Intake |
|---|---|---|---|
| AI&DS | - | 516299510 | 120 |
| Civil | - | 516219110 | 120 |
| Computer | - | 516224510 | 120 |
| Electrical | - | 516229310 | 120 |
| E&CE | - | 516284410 | 120 |
| E &TC | - | 516237210 | 120 |
| IT | - | 516224610 | 120 |
| Mechanical | - | 516261210 | 120 |
| Auto. & Robotics | - | 516291610 | 120 |
| MBA | - | 516210110 | 120 |

Mandalik Payal 20 LPA
Shelke Omkrushna 20 LPA
Navale Snehal 20 LPA
Harshada Pawar 8.8 LPA
Om Gunjal 7.09 LPA
Bushra Shaikh 8.0 LPA
Suraj Khairnar 6.18 LPA
Sayali Sawant 5.6 LPA
Chinmay Nikam 5.6 LPA
Our Top Recruiters
TCS, Infosys, Cognizant, Mahindra, ABB, TATA TECHNOLOGIES, TECH mahindra, Capgemini, esds, FOX, RINEX, BOSCH, TDK, accenture, Johnson Controls, Epitome Components, Mahindra, ASHIDA
50+ International Placements on 20 LPA
ADMISSIONS OPEN 2026-27
5 Times Accredited by NBA
NAAC A+ Accredited
Two Times BEST COLLEGE AWARD by SPPU, Pune
All India 9th Rank in the category of Top Engineering College of Eminence
4th Rank in the State of Maharashtra
by CSR Engineering Colleges Survey - June, 2026
9175 940 037 / 9175 270 037 principal@avcoe.org www.avcoe.org

# कत्तलीसाठी वाहतूक होणाऱ्या ११ गायी, दोन वासरे, २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कोल्हार-घोटी मार्गावर कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या आयशर टेम्पोवर संगमनेर उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने मध्यरात्री कारवाई केली. या कारवाईत तब्बल ११ गायी व दोन वासरे तसेच सुमारे २० लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो असा एकूण २५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एका संशयिताला जनावरांसह ताब्यात घेण्यात आले आहे.

ही कारवाई शुक्रवार, ७ ऑगस्ट रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास कोल्हार-घोटी रोडवरील वडगाव पान शिवारात, हॉटेल रुबाबच्या पुढे टोलनाक्याजवळ करण्यात आली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाला कोल्हार-घोटी रस्त्यावरून एका वाहनातून जनावरांची कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहिती



मिळताच पोलिसांनी संशयित वाहनाचा शोध सुरू केला. काही वेळातच एमएच १७ सीव्ही ७८४७ क्रमांकाचा आयशर टेम्पो संशयास्पदरीत्या जाताना आढळून आला. पोलिसांनी वाहन अडवून तपासणी केली असता त्यामध्ये जनावरे आढळून आली.

या कारवाईत नजर मेहबूब शेख (रा. निंबाळे, ता. संगमनेर) याला ताब्यात घेण्यात आले. वाहनातील ११ गोंश जातीच्या गायींची प्रत्येकी ४५ हजार रुपये याप्रमाणे ४ लाख ९५ हजार रुपये, तर दोन वासरांची किंमत ५ हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय सुमारे २० लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो प्रो ३०१९ जप्त करण्यात आला.

या कारवाईत एकूण २५ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला असून, आरोपीला मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस कॉन्स्टेबल बापूसाहेब हांडे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल सारबंदे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, संगमनेर यांच्या पथकाने केली. पुढील तपास तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, कोल्हार-घोटी मार्गावर रात्रीच्या वेळी पोलिसांकडून सुरू असलेल्या गस्तीमुळे जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जात असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

# साकूरमध्ये बिबट्याचा बंदोबस्त, भिती कायम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील साकूर गावात मागील दोन महिन्यापासून एका बिबट मादीचा तीच्या दोन बछड्यासह वावर आहे. अशी माहिती स्थानिकांनी दिल्यानंतर व बुधवारी दिं. ५ ऑगस्ट रोजी सकाळीच बिबट्याने मानवी वस्तीत धडक दिल्याने मोठी खळबळ उडाली होती. या बिबट्याचा व्हिडीओ जागृत नागरिकांनी काढून वनविभागाला पाठवला. यावेळी साकूर चा आठवडे बाजार असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले होते. यानंतर वन विभागाने दखल घेत

**वनविभागाच्या मोहिमेला यश**



वनरक्षक शंकर खेमनर यांच्या पथकाने शोध मोहीम हाती घेऊन एक बिबट्या पकडण्यात यश मिळवले आहे. साकूर ग्रामस्थांनी यावेळी वनरक्षक शंकर खेमनर यांचेअभिनंदन केले आहे.

या पथकाने अभ्यासपूर्ण बिबट्याचा माग काढला. ग्रामस्थांशी व प्रत्यक्षदर्शी यांच्याशी चर्चा करून त्याअनुषंगाने दोन पिंजरे परिसरात बसविण्यात आले होते. परिसराचे परीक्षण करून वनरक्षक शंकर खेमनर व त्यांच्या टीमला अखेर एक बिबटचा पिंजऱ्यात अडकविण्यात यश मिळवले आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते येथे अजून एक मादी बिबट व आणखी एक बछडं आहे. एक बिबट्या पकडला आहे. पण आणखी दोन बिबटे असल्याने आमची भीती कायम आहे. परंतू वनरक्षक यांनी दिलेल्या माहितीनुसार अफवांवर विश्वास ठेऊ नका असे आवाहन केले आहे. तीन बिबटे या छोट्याश्या परिसरात राहू शकत नाहीत.

# कर्जमाफीची रक्कम दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात - कृषिमंत्री दत्ता भरणे

कोल्हापूर - राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीला वेग आला असून, पुढील दोन दिवसांत पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कोल्हापूर येथे पत्रकार परिषदेत दिली.

या कर्जमाफी योजनेचा लाभ राज्यातील ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना मिळणार असून, यासाठी राज्य सरकार तब्बल ४० हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. पहिल्या टप्प्यात लहान शेतकऱ्यांना, तर दुसऱ्या टप्प्यात मोठ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सध्या ई-केवायसीप्रक्रिया युद्धपातळीवर सुरू असून, आतापर्यंत १२ लाख शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. पुढील दोन दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होताच पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट रक्कम वर्ग केली जाणार आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये काही तांत्रिक अडचणी असल्या तरी शेतकऱ्यांनी चिंता करू नये, असे आवाहन कृषिमंत्र्यांनी केले. कर्जमाफीची रक्कम कमी जमा झाली तरी उर्वरित रक्कम संबंधित बँका माफ करतील. तसेच कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांना 'थकबाकी नाही' (नील) दाखला उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. कर्जमाफीच्या आणखी तीन याद्या प्रसिद्ध होणार असल्याने पहिल्या यादीत नाव नसलेल्या शेतकऱ्यांनी संयम बाळगावा. कोणत्याही परिस्थितीत आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ नये, असे भावनिक आवाहनही दत्तात्रय भरणे यांनी केले.

आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना सध्या या योजनेचा लाभ लागू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, या संदर्भात उद्या उच्चस्तरीय बैठक होणार असून त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाइल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्रे) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25